# 'नियमीत प्रसिध्दी पत्रक'
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.

रविवार, दि.१३/०९/२०२०
वेळ: १८.३०

## "मोटार वाहन कायदा अंतर्गत २५० कारवाया- ५०,६०० ₹ 'तडजोड शुल्क प्राप्त."

उस्मानाबाद जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर दि. १२.०९.२०२० रोजी १८ पोलीस ठाणी व उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा यांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत २५० कारवाया करुन ५०,६०० ₹ **'तडजोड शुल्क'** वसुल केले आहे.

## "मनाई आदेशांचे उल्लंघन १३ पोलीस कारवायांत ३,२००/-रु. दंड वसुल."

**उस्मानाबाद जिल्हा:** कोविड- १९ संबंधीच्या मनाई आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द उस्मानाबाद पोलीस दलाने दि. १२.०९.२०२० रोजी जिल्हाभरात खालील प्रमाणे दंडात्मक कारवाया केल्या आहेत.

**१)सार्वजनिक स्थळी थुंकणे:** ११ कारवायांत- २,२००/- रु. दंड प्राप्त.

**२)सार्वजनिक ठिकाणी दोन व्यक्तीत सुरक्षीत अंतर न राखणे:** २ कारवायांत १,०००/-रु. दंड प्राप्त.

## "जुगार विरोधी कारवाई."

**पोलीस ठाणे, परंडा:** जुगार चालू असल्याच्या गोपनीय खबरेवरुन परंडा पो.ठा. च्या पोलीसांनी काल दि. १२.०९.२०२० रोजी वारदवाडी फाटा परिसरात छापा मारला. यात मयुरी हॉटेलच्या बाजूस असलेल्या बाळासाहेब चौधरी यांच्या शेडमध्ये १) मनोज कटारे २) बालाजी इंगळे ३) गणेश डोंगळे ४) बाळासाहेब कदम ५) मुकेश भोरे ६) अतुल बागल ७) सचिन ढोले ८) सुरेश काळे ९) महेश पवार १०) हरी ढेरे ११) अमर विधाते, सर्व रा. बार्शी हे तिरट जुगार साहित्यासह रोख रक्कम, ५ मोबाईल फोन व ४ मोटारसायकल असा एकुण १,६३,०७०/-रु. च्या मालासह आढळले.

**पोलीस ठाणे, मुरुम:** आशोक पंढरी माने, रा. येणेगूर, ता. उमरगा हा दि. १२.०९.२०२० रोजी येणेगूर येथील मल्हार हॉटेलच्या समोर रस्त्यावर मुंबई मटका जुगार खेळत असतांना जुगार साहित्य व रोख रक्कम ७१०/- रु. बाळगला असतांना पो.ठा. मुरुम यांच्या पथकास आढळला.

**यावरुन नमूद १२ व्यक्तींविरुध्द म.जु.का. अंतर्गत संबंधीत पो.ठा. येथे गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.**

## "अवैध मद्य विरोधी कारवाई"

**पोलीस ठाणे, मुरुम:** मलकाप्पा खंडु गावडे, रा. अचलेर, ता. लोहारा हा दि. १२.०९.२०२० रोजी गावातील पाणी पुरवठा टाकीजवळ ०५ लि. गावठी दारु (किं.अं. ५३०/-रु.) अवैधपणे बाळगला असतांना पो.ठा. मुरुमच्या पथकास आढळला. यावरुन पोलीसांनी नमूद आरोपीविरुध्द म.दा.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## “अल्पवयीन मुलीचे अपहरण.”

**पोलीस ठाणे, उमरगा:** पाणी आणण्यासाठी जाते असे सांगुन एक १६ वर्षीय मुलगी (नाव- गाव गोपनीय) दि. ३०.०८.२०२० रोजी १९.०० वा. सु. घराबाहेर गेली. ती परत न आल्याने कुटूंबीयानी तीचा शोध घेतला असतां काही उपयुक्त माहिती मिळाली नाही. यावरुन तीचे अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी हपहरण केले असावे. अशा मजकुराच्या अपहृत मुलीच्या वडीलाच्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३६३ अन्वये दि. १२.०९.२०२० रोजी गुन्हा नोंदवला आहे.

## “महिलेचा विनयभंग.”

**उस्मानाबाद जिल्हा:** एक मजुर महिला (नाव- गाव गोपनीय) दि. १२.०९.२०२० रोजी १५.३० वा. सु. गावातीलच एका शेतात मजुरी काम करत असतांना त्याच गावातील एक मद्यधुंद तरुण तेथे आला. त्याने त्या महिलेस अनावश्यक व लज्जास्पद विचारपुस करुन त्या महिलेचा हात पकडून तीला जवळ ओढण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्या महिलेने त्या मद्यधुंद तरुणास ढकलून देउन आपली सुटका करुन घेतली. अशा मजकुराच्या पिडीत महिलेने दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३५४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “चोरी”

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (श.):** आशिष बबन साळुंके, रा. कोट गल्ली, उस्मानाबाद याने व्यक्तीगत उधाऱ्या देण्यासाठी दि. १२.०९.२०२० रोजी १०.०० वा. सु. राहत्या घरातून स्वत:च्या आईचे ७ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरले. यावरुन त्याची आई- मंगल बबन साळुंके यांनी दि. १२.०९.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३८० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** बालाजी रावसाहेब देवकर, रा. कार्ला, ता. तुळजापूर यांच्या कार्ला येथील शेतातील चंदनाचे झाड अज्ञात चोरट्याने दि. १२.०९.२०२० रोजी ०९.०० वा. सु. कापून चोरुन नेले. अशा मजकुराच्या बालाजी देवकर यांनी दि. १३.०९.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** सुमित बळीराम मुसळे, रा. नगारवाडी, ता. लोहा हे मोटारसायकलने दि. १२.०९.२०२० रोजी रात्री ०१.४५ वा. सु. तुळजापूर- लातुर असा प्रवास मोटारसायकलने करत होते. यावेळी तुळजापूर बायपास रस्यावर २ अनोळखी व्यक्तींनी त्यांची मोटारसायकल सुमित मुसळे यांच्या मो.सा. समोर आडवी लाउन सुमित मुसळे यांना शिवीगाळ, दमदाटी करुन त्यांच्याजवळील रोख रक्कम ५,२३०/-रु., विवो मोबाईल फोन व खरेदी केलेले तीन टी-शर्ट जबरीने घेउन गेले. अशा मजकुराच्या सुमित मुसळे यांनी दि. १२.०९.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३९२, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “मारहाण.”

**<u>पोलीस ठाणे, शिराढोण:</u>** अनिल कडाप्पा गायकवाड, रा. मंगरुळ, ता. कळंब (ह.मु. द्वारकानगरी, कळंब) यांच्या जनावरांनी भाऊबंद- सिध्देश्वर गायकवाड यांच्या शेतातील सोयाबीनचे पिक खाल्ले. या कारणावरुन सिध्देश्वर गायकवाड व बेबी गायकवाड अशा दोघांनी दि. ११.०९.२०२० रोजी ११.०० वा. सु. रोजी कळंब गोशाळा येथे अनिल गायकवाड यांना शिवीगाळ करुन कुऱ्हाड डोक्यात मारुन गंभीर जखमी केले. तसेच ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या अनिल गायकवाड यांनी दि. १२.०९.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३०७, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**<u>पोलीस ठाणे, तुळजापूर:</u>** तुळजापूर तालुक्यातील ढेकरी येथील देविदास हरीदास जाधव व आगतराव महादु पठाडे यांच्यात शेत रस्ता दुरुस्तीचा खर्च व वापराच्या कारणावरुन वाद आहे. या दोन्ही गटात दि. १०.०९.२०२० रोजी १८.३० वा. सु. शेतामध्ये पुन्हा वाद उफाळून आला. यात आगतराव पठाडे, आकाश, पांडुरंग, शोभा, अन्य ४ व्यक्ती यांचा गट व जाधव कुटूंबातील देवीदास जाधव, कालीदास, कैलास, विकास, मनोज, महेश, अविनाश व अन्य व्यक्ती यांचा गट यांनी परस्परविरोधी गटांतील सदस्यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, कत्ती, चाकु, काठीने मारहाण करुन जखमी केले.

**अशा मजकुराच्या दोन्ही गटांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या परस्परविरोधी २ प्रथम खबरेवरुन दि. १२.०९.२०२० रोजी गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.**

---

**जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद पोलीस.**